व.लि.
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 128 दिनांक - 23·01·25
संबंधित अधि./कर्म.
न.र. 23·1·25
web publication
23/1
उ.स.न.र.

**प्रारुप विकास योजना पिंपरी - चिंचवड महानगरपालिका**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये मुदतवाढ.

-: आदेश :-

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती कार्यालये,**
**पुणे-४११ ००१.**

दि.१७.०१.२०२५.

**आदेश क्र.**:- वि.यो.पिंपरी-चिंचवड मनपा/मुदतवाढ/कलम २६/टिपीव्ही-१/३९८ .

**निर्णय**:- सोबतचे शासकीय आदेश (मराठी व इंग्रजी भाषेतील) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

(मूळ मसुदा मा.संचालक यांनी मंजूर केला आहे.)

(अशोक कांबळे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.

प्रति,

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.

/- कृपया सोबत आदेश (इंग्रजी व मराठी) महाराष्ट्र शासन राजपत्रात (पुणे विभागीय पुरवणी) प्रसिध्द करुन त्यांच्या ५ छापील प्रती या कार्यालयास व प्रत्येकी २ छापील प्रती सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे आणि सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांना पाठवाव्यात.

**प्रत माहितीस्तव सादर** :-

१) मा. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग (नवि-१३), मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीस्तव** :-

२) सहसचिव तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रशासक तथा आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड.
४) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव** :-

५) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
/- त्यांनी सदरची अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
६) उपसंचालक, नगर रचना, विकास योजना विशेष घटक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड.
७) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
# महाराष्ट्र राज्य, पुणे

**आदेश**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

क्र.वि.यो.पिंपरी-चिंचवड/मुदतवाढ/कलम२६/१८८/टिपीव्ही-१/ ३१८ दि.१७.०१.२०२५.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेला) च्या कलम २३(१) व ३८ मधील तरतुदीनुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (यापुढे "उक्त महानगरपालिका" असे निर्देशिलेली) पिंपरी-चिंचवड शहराची दुसरी सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) तयार करण्याचा इरादा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४५३, दि.०७.०९.२०१९ व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण ठराव क्र.३४०, दि.०९.०८.२०२१ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दि.२०.११.२०१९ रोजी प्रसिध्द केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २३(१) चे तरतुदीन्वये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या सूचनेच्या तारखेपासून २४ महिन्यांच्या मुदतीत, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) चे तरतुदीनुसार उक्त महानगरपालिकेने उक्त विकास योजना तयार करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये आणि इतर विहित मार्गाने जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेकडील, सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र.७९८, दि.१०.१२.२०२४ चे अनुषंगाने उक्त महानगरपालिकेने पत्र क्र.नरवि/कावि/१०/०५/२०२५, दि.१०.०१.२०२५ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) च्या तरतुदीनुसार उक्त विकास योजना तयार करुन, त्यासंबंधातील सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करणे, ही सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास मुदतवाढ मंजूरीचा प्रस्ताव संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केला;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र पुणे यांचेकडील आदेश क्र.वि.यो.पिंपरी-चिंचवड/मुदतवाढ/कलम२६/टिपीव्ही-१/८२५, दि.०५.०२.२०२४ अन्वये दि.१४.०१.२०२४ ते दि.०९.०३.२०२४ पर्यंत ५६ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र पुणे यांचेकडील आदेश क्र.वि.यो.पिंपरी-चिंचवड/मुदतवाढ/कलम२६/टिपीव्ही-१/१५४३, दि.०७.०३.२०२४ अन्वये दि.१०.०३.२०२४ ते दि.१३.०९.२०२४ पर्यंत १८८ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने पत्र क्र.नरवि/कावि/१०/०५/२०२५, दि.१०.०१.२०२५ अन्वये, सद्यस्थितीत प्रारूप विकास योजना प्रसिद्ध होणेस लागणारा कालावधी विचारात घेऊन, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहीतेचा दि.१५.१०.२०२४ ते दि.२५.११.२०२४ असा ४२ दिवसांचा कालावधी वगळून उर्वरीत १२१ दिवसांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १४८-अ नुसारचा कालावधी वगळल्यानंतर, कलम २६(१) चे तरतुदीमधील तिसऱ्या परंतुकामधील खंड(दोन) मधील तरतुदीनुसार उक्त विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी १२ महिन्यांची (३६५ दिवस) मुदतवाढ अनुज्ञेय आहे. त्यान्वये उक्त महानगरपालिकेने उर्वरित १२१ दिवसांची म्हणजेच दि.१८.०५.२०२५ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिलेली आहे;

आणि ज्याआर्थी, उक्त प्रस्तावामध्ये नमूद कारणमिमांसा विचारात घेता, उक्त विकास योजना तयार करुन, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याकरिता लागणारा कालावधी दि.१८.०५.२०२५ या दिवसापर्यंत वाढविणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.१०८/नवि-१३, दि.१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रत्यायोजित केलेल्या शक्तींचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) चे तरतुदीन्वये उक्त विकास योजना तयार करुन त्याबद्दलची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याचा कालावधी दि.१८.०५.२०२५ हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत वाढवित आहेत.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Government of Maharashtra**
**TOWN PLANNING & VALUATION DEPARTMENT**
**Maharashtra State, Pune.**

**ORDER**

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

No. DP-PCMC/Extn./U/Sec 26/TPV-1/188/ 318 Date:-17.01.2025

Whereas, Pimpri-Chinchwad Municipal Corporation (hereinafter referred to as (**"the said Municipal Corporation"**) by its Resolution No.453, dated 07.09.2019 and Pimpri-Chinchwad New Town Development Authority by its Resolution No.340, dated 09.08.2021 made a declaration under the provisions of sub-section (1) of section 23 & section 38 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as **"the said Act"**) of its intention to prepare the second revised Development Plan for Pimpri-Chinchwad City (hereinafter referred to as **"the said Development Plan"**), the notice of the said declaration was published in the Maharashtra Government Gazette on 20.11.2019;

And whereas, in accordance with the provisions of sub-section (1) of Section 26 of the said Act, the said Municipal Corporation has to prepare the said Development Plan and publish a notice of such preparation in the Maharashtra Government Gazette and in other prescribed manner not later than 24 months from the date of notice published in the Maharashtra Government Gazette under the provisions of section 23 of the said Act;

And whereas, the said Municipal Corporation has passed General Body Administrative Resolution No. No.798, dated 10.12.2024 for extension of time limit for publishing a notice of such preparation of the said Development Plan in the Official Gazette and in other prescribed manner under the provisions of sub-section (1) of Section 26 of the said Act. And accordingly submitted the proposal of extension of time limit to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide its letter no.TPD/CV/10/05/2025, dated 10.01.2025.

And whereas, Director of Town Planning has sanctioned extension of time limit by 56 days from 14.01.2024 to 09.03.2024 vide its Order No.D.P.PCMC/Extension/Sec.26/ TPV-1/825, dated.05.02.2024;

And whereas, Director of Town Planning has sanctioned extension of time limit by 188 days from 10.03.2024 to 13.09.2024 vide its Order No.D.P.PCMC/Extension/Sec.26/ TPV-1/1543, dated.07.03.2024;

And whereas, the said Minicipal Corporation, by adding the remaining 121 days in above extended period and taking into account the period required for publication of the draft development plan after excluding 42 days, i.e. from 15.10.2024 to 25.11.2024 period of the Code of Conduct for Assembly Elections in the state, has submitted the proposal for extension of time limit vide its marathi letter No.नरवि/कावि/१०/०५/२०२५, दि.१०.०१.२०२५.

And whereas, as per under the provisions of sub-section (1) (ii) of Section 26 of the said Act an extension of 12 months i.e. 365 days is permissible for preparation of the said Development Plan and publication of the notice of such preparation in the Maharashtra Government Gazette and in other prescribed manner of the said Development Plan after excluding the period as per provisions of Section 148-A of the said Act. However, the said Municipal Corporation has expected an extension of time limit for remaining 121 days that is upto 18.05.2025;

And whereas, considering the reasons mentioned in the said propasal the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that it is expedient to extend the period for the publication of the notice of such preparation of the said Development Plan in the Maharashtra Government Gazette and in other prescribed manner for a further period upto 18.05.2025;

Now, therefore, in exercise of powers delegated to him under Government Notification, No.TPS-1813/3211/CR-108/UD-13, dated 1st December, 2016, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby extends the period for preparation of the said Development Plan and publication of the notice of such preparation in the Maharashtra Government Gazette and in other prescribed manner upto and inclusive of 18.05.2025, under the provisions of sub-section (1) of Section 26 of the said Act.

TOWN PLANNING AND VALUATION DEPARTMENT
DIRECTOR OF TOWN PLANNING
M.S. PUNE

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.